दाखल तारीख : १२/ ०२ / २०२६
फैल तारीख : १७ / ०२ / २०२६
निकाल तारीख: १४ / ०३ / २०२६

# तडजोड हुकूमनामा

रे.क.नं. 47/2026

नि. नं. १९ / अ

**मे. दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, इचलकरंजी**

**यांचे कोर्टात...**

| | |
|---|---|
| 1) **श्री. अष्टविनायक रायगोंडा पाटील,**<br>व.व. 40, धंदा- शेती,<br>रा. राम मंदिरजवळ, तारदाळ,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर<br>2) **बाबू खानगोंडा पाटील (मयत वारस)**<br>अ) **श्री. बसगोंडा बाबू पाटील,**<br>व.व. 83, धंदा- शेती,<br>रा. गावभाग, तारदाळ,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | वादी |

6) **क.ग.नं. 964** क्षेत्र हे. 0.02 आर., आकार रु. 0.20 पैसे यापैकी वादी व प्रतिवाद यांचे हिस्सेचे क्षेत्र हे. 0–00.50 आर., आकार रु. 0.05 पैसेची स्मशानभूमीची समाईक शेत मिळकत यापैकी प्रतिवादी नं. 1 ते 3 यांना समाईकात 1/3 हिस्सेची मिळकत.

7) येणेप्रमाणे वर कलम 2 मध्ये नमूद मिळकत वादी नं. 1 यांचे हिस्सेस तर कलम 3 मध्ये नमूद मिळकत वादी नं. 2 (अ), (ब) व (क) यांचे हिस्सेस, कलम 4 व 6 मध्ये नमूद मिळकत प्रतिवादी नं. 1 यांचे हिस्सेस तर कलम 5 व 6 मध्ये नमूद मिळकत प्रतिवादी नं. 2 व 3 यांचे हिस्सेस सदर तडजोड पुरसीस द्वारे आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कास व कब्जे वहिवाटीस दिलेल्या आहेत.

8) सदर तडजोड पुरसीस सोबत वर नमूद वादी नं. 1, 2 (अ), (ब) व (क) तसेच प्रतिवादी नं. 1 ते 3 यांनी त्यांना आलेल्या हिस्सेबाबत स्वतंत्रपणे बिनस्केली समजुतीचा नकाशा जोडून त्यावरती सह्या केलेल्या आहेत. सदरचा समजुतीचा नकाशा हा सदर पुरसीचा मुख्य भाग आहे.

9) सदर तडजोड पुरसीसमधील संपूर्ण मजकूर प्रस्तुत वादी नं. 1, 2 (अ), (ब) व (क) तसेच प्रतिवादी नं. 1 ते 3 यांचे सांगणेप्रमाणे तयार केला असून तो त्यांनी वाचून पाहून समजावून घेऊन संपूर्ण पुरसीसमधील मजकूर मान्य व कबूल असलेबाबत तडजोड पुरसीस लिहून ठेवणार नात्याने सह्या व अंगठे केलेले आहेत.

10) येणेप्रमाणे वादी नं. 1, 2 (अ), (ब) व (क) तसेच प्रतिवादी नं. 1 ते 3 यांचे दरम्यान आपसात तडजोड झाली असलेने त्यानुसार आपसात

